सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००६०८**

**अपिलार्थी श्री. तुळशीदास मुरारी कवाळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कार्या-१)**
मुख्य सचिवांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव**
मुख्य सचिवांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०७.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०७.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.१०.२०२१ | २७.१०.२०२१ | ०७.१२.२०२१ | १३.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०२.०२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये बरोबर माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २७.१०.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १३.०१.२०२२ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २१.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी केलेले विभिन्न अर्जांवर करण्यात आलेली कार्यवाही विषयी माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.१०.२०२१ रोजी अपिलार्थींना कळविले की, त्यांचे माहिती अर्जात नमुद केलेली विभिन्न दिनांकाचे अर्ज प्रशासकीय विभागास उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. २७.१०.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०१.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाहीची माहिती अपिलार्थींना दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.१०.२०२१ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार अपिलार्थींनी जलसंधारण विभागाकडून पुढील माहिती घेणे अपेक्षित आहे असे नोंदवून प्रथम अपील अमान्य करुन निकाली काढलेले आहे.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. ११.०७.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निवेदन सादर करुन नमुद केले की, जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थींना दिलेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**

**दिनांक : १२.०७.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**